माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.५८१०/२३/अ.क्र.८८१०/२५

श्री.श्रीनिवास चंद्रकांत कोपेंल्ली

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग, ४ था मजला मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव
सार्वजनिक बांधकाम विभाग, ४ था मजला मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०१.२०२३ | १३.०२.२०२३ | २०.०२.२०२३ | १५.०३.२०२३ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी श्री.श्रीनिवास कोपेंल्ली यांनी दाखल केलेल्या दि.०६.०१.२०२३ रोजीच्या मूळ जोडपत्रानुसार मागितलेली माहितीची उपलब्धतता ही जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१३.०२.२०२३ रोजीच केली असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकनावरुन आढळून येते.

त्याविरुध्द दाखल दि.२०.०२.२०२३ रोजीच्या प्रथम अपिल आदेशावर तत्कालिन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (सेवा) सार्व.बांधकाम विभाग यांनी दि.१५.०३.२०२३ रोजी दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर तसेच कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थींना प्रदान केली असल्याचे नमूद करीत अपिल अर्ज निकाली काढला आहे. दाखल उपरोक्त द्वितीय अपिल अर्ज आज सुनावणीस घेण्यात आला असून अपिलार्थी सुनावणीस उपस्थित नाहीत. प्राधिकरणाने सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकनांतर यातील **जोडपत्र अ** मधील अपेक्षित असणारी संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी स्तरावरुन या आधीच पुरविण्यात आली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता दाखल केलेला द्वितीय अपिल अर्ज तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**